**नि.फौ.ख.क्र. ९४/२०२५**
**सरकार वि. अमोल मोरे**
**निशाणी क्र.६०**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ९ यांचे सत्यप्रतिज्ञेवर कथन.**

माझे नाव –अमोल सेवक कोळेकर,
माझे वय – ३१ वर्षे, धंदा – शेती
रा.दिघी,ता. कर्जत, जि. अहिल्यानगर

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सरकारी विधीज्ञ श्रीमती एस.एन.वायकर यांचेमार्फत शपथेवर सुरु –**

दि.०५.०३.२०१९ रोजी मला दादा जमदाडे यांच्याकडून समजले की, अमोल अरुण मोरे यांच्याकडे जेसीबी विक्रीस आहे. मी अमोल मोरे यांच्याकडे गेलो व जेसीबी मशीन पाहिले. मला जेसीबी मशीन आवडले व माझा अमोल सोबत र.रु.६,३१,०००/– ला जेसीबी खरेदीचा व्यवहार ठरला. सदर जेसीबीचा क्र.एम.एच.२०–ए.वाय.–६२८५ असा होता. सदर खरेदीच्या व्यवहारासाठी मी जेसीबी खरेदीची नोटरी फलटण येथे केली. मी अमोल मोरे यांना विसारा पोटी र.रु.७६,०००/– रोख दिले, र.रु.२,५०,०००/– रोख व र.रु.१,९०,०००/– ऑनलाईन केले असे एकूण र.रु.५,१६,०००/– दिले. सदर जेसीबीवर श्रीराम फायनान्सचे उर्वरित लोन होते. सदर कर्ज हे दरमहा र.रु.१२,०८७/– प्रमाणे १८ हप्ते मी भरण्याचे ठरले होते. मी सदर कर्जाच्या हप्त्यापैकी १२ हप्ते आकाश पवार याच्या नावावर भरले व १२ हप्ते अमोल मोरे याच्या नावावर भरले.

२. सदर नोटरीचा मुळ दस्त हा श्रीराम फायनान्स कंपनीसाठी लागत असल्याचे अमोल मोरे याने सांगितले व मी त्याला सदरची मुळ नोटरी दस्त दिला. सदर कर्जाचे पुर्ण हप्ते भरल्यानंतर एन.ओ.सी. साठी मी अमोल मोरे यांना सांगितले. परंतु, अमोल मोरे याने फायनान्स भरण्याचे राहिले आहे असे मला सांगितले. मी फलटण येथे आल्यावर मला समजले की, जेसीबीवर टायर, डिझेल व वैयक्तीक कर्ज असे प्रत्येकी र.रु.१४,०००/–, २८,०००/– व ४६,०००/– असे व्याज व मुद्दल धरुन एकूण ३ लाखाच्या वर कर्ज होते. सदर कर्ज अमोल मोरे याने सदर जेसीबीची नोटरी मला करुन दिल्यानंतर काढले होते. त्यानंतर मी अमोल मोरे यांना सदरचे कर्ज भरण्याबाबत विनंती

केली होती. परंतु, अमोल मोरे याने ते कर्ज तुलाच भरावे लागेल असे मला सांगितले. मी मोरे यांना १ लाख रुपये भरतो व राहिलेले तुम्ही भरा असे सांगितले, त्याने नकार दिला. त्यानंतर त्याने मला मारहाण केली. त्यामुळे मी तेथुन निघून गेलो.

३. त्यानंतर मी सदरचे जेसीबी मशीन अतुल शिवाजी रासकर यांना र.रु. ४ लाखला नोटरी दस्ताने विकुन टाकली. आता मला नोटरी दस्त दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास यापूर्वी नि.क्र.४० देण्यात आलेला आहे. त्यानंतर मला दोन तीन महिन्यानंतर लोणंद पोलिसांचा फोन आला की, जेसीबी मशीन चोरीला गेल्याची रासकर याने तक्रार दिली होती व ते मशीन पोलिस स्टेशनला जमा आहे. पोलिसांनी माझ्याकडे चौकशी केली होती. आरोपीला पाहिल्यास मी ओळखू शकतो. तो आजरोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**साक्षीदाराचा उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.पी.पी.जाधव यांचे मार्फत शपथेवर सुरु–**

४. मी आरोपीला सन २०१९ पासून ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, जेसीबीचा मुळ मालक अमोल मोरे होता. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी जेसीबीचा मालक आरोपी आहे. साक्षीदार सांगतो की, जेसीबीचे कागद आजरोजी आरोपीच्या नावावर आहेत परंतु त्याने ते ट्रान्सफर करुन दिलेले नाहीत.

प्रश्न– तुम्ही आरोपीने जेसीबी तुमच्या नावावर करुन दिला नाही म्हणून तुम्ही त्याला नोटीस पाठवली काय?

उत्तर– मी त्याला नोटीस पाठवली नाही, परंतु त्याला त्याबाबत फोन केले होते.

५. मला सांगता येणार नाही की, मी आरोपीला कधी फोन केले होते. माझा पत्ता रा. दिघी, ता. कर्जत, जि. अहमदनगर हा बरोबर आहे. आता मला संचिकेवरील दाखल दि.२७.०१.२०२३ रोजीची नोटीस दाखवण्यात आली. सदर नोटीसला **नि.क्र.६१** देण्यात येत आहे. सदर नोटीस मला आली होती परंतु मी घेतली नाही. मी सदर नोटीस वाचली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, सदर नोटीस मला मिळाली होती व त्याची पोहोचवर मी मिळाल्याची सही केली होती. मला आरोपीने दिलेल्या तक्रार

अर्जाबाबत कर्जत येथे पोलिसांनी बोलावले होते. मी पोलिस स्टेशनला आरोपीने दिलेला तक्रार अर्ज वाचला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, अमोल मोरे याने फलटण पोलिस स्टेशनला माझ्या विरुद्ध तक्रार दिली होती हे मला माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला फलटण पोलिस स्टेशनमधून कोळेकर या पोलिसांचा फोन आला होता. मी तेव्हा फलटण पोलिस स्टेशनला गेलो नाही. मी कर्जत पोलिस स्टेशनला तक्रारीबाबत चौकशी केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मला तक्रारीबाबत सर्व माहिती होती.

६. आरोपीने मला नोटीस पाठवून जेसीबी नावावर करुन घे असे कळविले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी जेसीबी स्वतःच्या नावावर करुन घेण्यासाठी टाळाटाळ केली होती. हे म्हणणे खरे आहे की, नोटरीवरुन कोणत्याही वस्तुची मालकी येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, जेसीबीची मला मालकी आली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मला जेसीबीची मालकी नसल्यामुळे मी जेसीबीची मालकी अतुल रासकर याला हस्तांतरित करु शकत नव्हतो याची मला माहिती होती. मी जेसीबी विकण्यासाठी अमोल मोरेची लेखी संमती घेतली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, जेसीबीचे मुळ कागदपत्र माझ्याकडे नाहीत. माझ्या नोटरीमधील मजकूर की, आजरोजी लिहून देणार हे सदर मशीनचे पुर्णतः मालक आहेत याबाबत मला माहिती नाही. अतुल रासकर याने माझ्या घरी आणून जेसीबीचे पैसे मला दिले होते. त्यावेळी माझी पत्नी होती. अतुल सोबत इतर दोघे होते, त्यांची नावे मला माहित नाहीत. या व्यतिरिक्त कोणी नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर रासकर हा जेसीबी मशीन घेवून गेला. मला निश्चीत तारीख सांगता येत नाही की, रासकर याने कोणत्या तारखेला पैसे दिले व जेसीबी घेवून गेला.

७. हे म्हणणे खरे आहे की, त्यादिवशी पैसे देणे व जेसीबी घेवून जाणे या व्यतिरिक्त काही झाले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी स्वतः स्टॅम्प खरेदी केला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, नोटरीचा स्टॅम्प मी स्वतः जावून माझ्या नावे खरेदी केला. हे म्हणणे खरे आहे की, नोटरीतील मजकूर कोणी लिहिला हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, नोटरी कोणत्या वकिलांकडे केली हे मी सांगु शकत नाही. **मध्यान्हाची वेळ झाल्याने उर्वरित उलटतपास मध्यान्ह वेळ संपेपर्यंत तहकुब करण्यात**

**येत आहे.**

**मध्यान्हानंतर उर्वरित उलटतपास पुन्हा शपथेवर सुरु–**

८. हे म्हणणे खरे आहे की, विसावा पोटी र.रु.७६,०००/– दिले हे दाखवण्यासाठी माझ्याकडे कोणताही पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की, २ लाख ५० हजार व १ लाख ९० हजार दिल्याबाबतचा पुरावा मी तपासी अधिकारी यांच्याकडे दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, तपास अधिकारी हे माझ्या गावाकडे या केसकामी जबाब घेण्यासाठी आले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, जेसीबी केस प्रकरणाबाबत मी पोलिस स्टेशनला गेलो नव्हतो व पोलिसांनी माझा जबाब घेतला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी आकाश पवार यांच्या खात्यावर १२ हप्ते व अमोल मोरे यांच्या नावावर १२ हप्ते भरल्याचा पुरावा तपास अधिकारी यांना देण्याचा प्रसंग आला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने नोटरीचा मुळ दस्त माझ्याकडून कधी घेतला त्याची निश्चीत तारीख मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, अमोलने माझ्याकडून नोटरीची मुळ प्रत घेतली नाही. हे म्हणणे खरे नाही की, अमोल याने नोटरीचा मुळ दस्त माझ्याकडून घेतला होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर कर्जाचे पुर्ण हप्ते भरल्यानंतर एन.ओ.सी.साठी अमोल मोरे यांना मी केव्हा सांगितले, याची तारीख मला सांगता येणार नाही. तसेच, अमोल मोरे याने फायनान्स भरण्याचे राहिले आहे असे मला केव्हा सांगितले हे मी सांगु शकत नाही.

९. मला जेसीबी चालविता येतो. हे म्हणणे खरे आहे की, अमोल मोरे याने जेसीबी माझ्या नावावर करण्यासाठी मला वेळोवेळी मदत केली होती. हे म्हणणे खरे आहे की, अमोल मोरे याने जेसीबीवर र.रु.१४ हजार, २८ हजार व ४६ हजार असे कर्ज काढलेले होते याची मला वैयक्तीक माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, जेसीबीवर रु.३ लाख कर्ज असल्याबाबत मला वैयक्तीक माहिती नाही. हे म्हणणे खरे आह की, जेसीबीवर टायर, डिझेल व वैयक्तीक कर्ज असल्याबाबत मी वैयक्तीक शहानिशा केली नाही.

१०. हे म्हणणे खरे नाही की, मला जेसीबी मशीन आवडले व माझा अमोल सोबत र.रु.६,३१,०००/– ला जेसीबी खरेदीचा व्यवहार ठरला, सदर जेसीबीचा

क्र.एम.एच.२०–ए.वाय.–६२८५ असा होता, सदर खरेदीच्या व्यवहारासाठी मी जेसीबी खरेदीची नोटरी फलटण येथे केली, मी अमोल मोरे यांना विसारा पोटी र.रु.७६,०००/– रोख दिले, र.रु.२,५०,०००/– रोख व र.रु.१,९०,०००/– ऑनलाईन केले असे एकूण र.रु.५,१६,०००/– दिले, सदर जेसीबीवर श्रीराम फायनान्सचे उर्वरित लोन होते, सदर कर्ज हे दरमहा र.रु.१२,०८७/– प्रमाणे १८ हप्ते मी भरण्याचे ठरले होते, मी सदर कर्जाच्या हप्त्यापैकी १२ हप्ते आकाश पवार याच्या नावावर भरले व १२ हप्ते अमोल मोरे याच्या नावावर भरले, सदर नोटरीचा मुळ दस्त हा श्रीराम फायनान्स कंपनीसाठी लागत असल्याचे अमोल मोरे याने सांगितले व मी त्याला सदरची मुळ नोटरी दस्त दिला, सदर कर्जाचे पुर्ण हप्ते भरल्यानंतर एन.ओ.सी. साठी मी अमोल मोरे यांना सांगितले, परंतु, अमोल मोरे याने फायनान्स भरण्याचे राहिले आहे असे मला सांगितले, मी फलटण येथे आल्यावर मला समजले की, जेसीबीवर टायर, डिझेल व वैयक्तीक कर्ज असे प्रत्येकी र.रु.१४,०००/–, २८,०००/– व ४६,०००/– असे व्याज व मुद्दल धरुन एकूण ३ लाखाच्या वर कर्ज होते, सदर कर्ज अमोल मोरे याने सदर जेसीबीची नोटरी मला करुन दिल्यानंतर काढले होते, त्यानंतर मी अमोल मोरे यांना सदरचे कर्ज भरण्याबाबत विनंती केली होती, परंतु, अमोल मोरे याने ते कर्ज तुलाच भरावे लागेल असे मला सांगितले, मी मोरे यांना १ लाख रुपये भरतो व राहिलेले तुम्ही भरा असे सांगितले, त्याने नकार दिला, त्यानंतर त्याने मला मारहाण केली, त्यामुळे मी तेथुन निघून गेलो, त्यानंतर मी सदरचे जेसीबी मशीन अतुल शिवाजी रासकर यांना र.रु. ४ लाखला नोटरी दस्ताने विकुन टाकली, त्यानंतर मला दोन तीन महिन्यानंतर लोणंद पोलिसांचा फोन आला की, जेसीबी मशीन चोरीला गेल्याची रासकर याने तक्रार दिली होती व ते मशीन पोलिस स्टेशनला जमा आहे....इ. मजकूर मी खोटा सांगत आहे.

११. हे म्हणणे खरे आहे की, मी अमोर मोरे याला कर्ज तुला भरावे लागेल असे सांगितले परंतु त्याने नकार दिला तसेच मी मोरे यांना १ लाख रुपये भरतो व राहिलेले तुम्ही भरा असे सांगितले, त्याने नकार दिला इ. कधी घडले त्याची निश्चीत तारीख मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने मला कधी मारहाण केली

त्याची निश्चीत तारीख मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने मारहाण केल्याबाबत मी कोठेही तक्रार केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझी आता आरोपीविषयी कोणतीही तक्रार नाही.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

फलटण. (ए.एस.साटोटे)
ता.३०.०३.२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, फलटण.
(न्यायालय क्र.३)